# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
## जनसंपर्क शाखा
Phone No. 07132-223142
E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com


# वार्तापत्र

दिनांक
०९/०८/२०१९

## “ नक्षलवाद्यांसोबत फिरुन आपले बहुमोल जीवन बरबाद करु नका ”

- **पोलीस नक्षल चकमकीत ठार झालेल्या रुपी उर्फ सुशीला नरोटे हिच्या वडिलांचे आदिवासी तरुणांना भावनिक आवाहन**

“तरुणांनो कष्ट करा अन् स्वत:चे पोट भरा, नक्षलवादाच्या नादी लागून आपले बहुमोल जीवन बरबाद करु नका” असे भावनिक उद्गार आहेत दिनांक २० जुलै २०१९ रोजी पोलीस नक्षल चकमकीत ठार झालेल्या रुपी नरोटे हिचे वडिल महारु नरोटे यांचे ! ते पुढे सांगतात, रुपी ला बालवयातच नक्षलवादी आपल्या सोबत बळजबरीने घेवून गेले तिला आपल्यासोबत नेतांना नक्षलवाद्यांनी ना आम्हाला काही विचारले ना त्या विषयी काही माहिती दिली. आम्ही तिचे नांव रुपी ठेवले होते. नक्षलवाद्यांनी रुपीला ‘सुशीला’ नाव दिले.

महारु नरोटे सांगतात कि, नक्षलवादी रुपीला घेवून गेल्यापासून ती फक्त दोन वेळेस घरी आली. पहिल्या वेळी ती जेव्हा कोईदुर येथे आपल्या राहत्या घरी आम्हाला भेटायला आली तेव्हा मी स्वत: तिला आमच्यासोबतच राहा असे सांगून मी तुझे थाटामाटात लग्न लावून देतो, तुझा संसार सुरु कर असे म्हणालो परंतु तिने माझे ऐकले नाही आणि ती निघुन गेली.

पोलीसांनी आम्हाला आत्मसमर्पण योजनेविषयी माहिती दिली होती. दुस-यांदा जेव्हा रुपी आम्हाला भेटायला आली तेव्हा मी तिला तु नक्षलवाद्यांसोबत फिरणे सोडून दे, तु आत्मसमर्पण कर, आम्ही तुला पोलीसांकडे घेवून जातो असे समजावण्याचा प्रयत्न केला परंतु तेव्हाही माझे ऐकले नाही कदाचित तेव्हा जर तिने माझे म्हणणे ऐकले असते तर आज ती मेली नसती असे सांगतांना महारु नरोटे यांचा कंठ भरुन आला होता.

नक्षलावाद्यांमुळे आपली मुलगी मारली गेली. आमचा म्हातारपणाचा आधार गेला असे सांगतांना त्यांना रडु कोसळले. दलम मध्ये गेलेल्या इतर आदिवासी तरुणांना तुम्ही काय आवाहन कराल असे विचारताच त्यांनी नक्षलवाद्यांच्या नादी लागून स्वत:चे बहुमोल जीवन बरबाद करु नका असे आवाहन केले.

नक्षलवादी हे रुपी उर्फ सुशिला नरोटे यांच्या सारख्या आदिवासी मुलींना व मुलांना बालवयातच त्यांच्या पालकांच्या संमतीशिवाय आपल्या सोबत घेवून जावून त्यांना बळजबरीने नक्षल दलम मध्ये काम करावयास भाग पाडतात, हे महारु नरोटे यांच्या सांगण्यावरुन स्पष्ट होते. तसेच बालवयातच त्यांना नक्षलवादी आपल्यासोबत घेवून जावून त्यांचे इतर जनसामान्यांशी असलेली नाळ तोडतात. त्यांचे निरागस बालपण व शिक्षणाचा अधिकार हिरावून घेतात. यामुळे ही मुले अशिक्षीत राहिल्यामुळे तसेच बाहेरच्या जगाशी संबंध न आल्यामुळे ते विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यास टाळाटाळ करतात, रूपी ने जर तिच्या आई वडीलांचे ऐकले असते तर आज ती आत्मसमर्पण योजनेचा लाभ घेवून जनसामान्यांसारखे सुंदर जीवन जगत असती. त्यामुळे गावक-यांनी पुढाकार घेवून अशा नक्षल्यांना आत्मसमर्पण करण्यास प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

दलममध्ये गेलेल्या आदिवासी तरुणांनी **''नवजीवन योजनेचा''**लाभ घेवून विकासाच्या मुळ प्रवाहात परत येण्यासाठी पोलीसांसमोर आत्मसमर्पण करावे, पोलीस दल त्यांना सर्वोतोपरी मदत करील. असे आवाहन मा.पोलीस अधिक्षक गडचिरोली श्री.शैलेश बलकवडे सो, यांनी केलेले आहे.